Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Fax : 25665807 | Secretary(P) : 25651750

तातडीचे/महत्वाचे
परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./परीक्षा-७/५३४०
पुणे - ४११ ००४
दिनांक - ०२/०९/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- सप्टेंबर-ऑक्टोबर २०२१ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) सप्टेंबर-ऑक्टोबर २०२१ साठी सर्व विभागीय मंडळातील सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सप्टेंबर-ऑक्टोबर २०२१ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर [redacted] बुधवार दिनांक ०८/०९/२०२१ पासून College login मध्ये download करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा व विभागीय मंडळाने व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ यांचेशी संपर्क साधावा.

उपरोक्तनुसार आपल्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक, प्राचार्यांना व विद्यार्थ्यांना याप्रमाणे अवगत करून देण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-४

क्र.कोविमं/इ.१२वी परीक्षा/ 1028
कोल्हापूर ४१६००४
दिनांक ०३/०९/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

इ.१२वी सप्टे.ऑक्टोबर २०२१ परीक्षेसाठीची प्रवेशपत्रे (Hall Ticket) मंडळाच्या संकेतस्थळावरुन Online पद्धतीने download करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येत असून वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
**विभागीय सचिव**
**म.रा.माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४.**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४**

क्र.कोविमं/माध्य.गोप./ 1022
कोल्हापूर-४१६ ००४.
दिनांक :- ०३.०९.२०२१

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय :- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ.१० वी ) पुरवणी परीक्षा सप्टे./ऑक्टों.- २०२१ च्या वेळापत्रकाबाबत...**

**संदर्भ:- राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-६/५२३६ दिनांक २७.०८.२०२१**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सप्टे./ऑक्टों. २०२१ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ.१० वी ) पुरवणी परीक्षा खाली नमूद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|
| १. | लेखी परीक्षा | **बुधवार दि. २२.०९.२०२१ ते शुक्रवार दि.०८.१०.२०२१** |
| २ | प्रात्यक्षिक,श्रेणी व तोंडी परीक्षा | **मंगळवार दि.२१.०९.२०२१ ते मंगळवार दि.०५.१०.२०२१** |
| ३ | तंत्र व पुर्व व्यावसायीक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ४ | नविन पुर्व व्यावसायीक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ५ | शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ६ | दिव्यांग विदयार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | |

सदर परीक्षेसाठी खालील सुचनांनुसार कार्यवाही करावी :-

१) विज्ञान व तंत्रज्ञान या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीने परीक्षा केंद्रावर लेखी परीक्षेच्या दिवशी घेण्यात येईल.
२) दिव्यांग विदयार्थ्यांच्या कार्यानुभव विषयांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २१.०९.२०२१ ते दि.०५.१०.२०२१ या कालावधित संबंधित शाळा मुख्याध्यापक यांनी आपल्या स्तरावरुन प्रचलित कार्यपध्दतीनुसार आयोजित कराव्यात.

३) विदयार्थी संख्येनुसार शाळांनी उपरोक्त नमूद केलेल्या कालावधीत (दिनांक २१.०९.२०२१ ते दि.०५.१०.२०२१) तोंडी परीक्षा/श्रेणी परीक्षा घेणे, संबंधित विदयार्थ्यांना त्यांच्या परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची माहिती परीक्षेपूर्वीच ठळक अक्षरात फळयावर दर्शनी भागावर सुचना लावण्यात यावी व विदयार्थ्यांना अवगत करण्याची दक्षता घ्यावी.

४) अंध, मुकबधिर, अपंग व बहुविकलांग विदयार्थ्यासाठी असलेल्या शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २१.०९.२०२१ ते दिनांक ०५.१०.२०२१ या कालावधीतच आयोजित करण्यात याव्यात.

५) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ.१० वी) पुरवणी परीक्षेच्या प्रात्यक्षिक परीक्षेचे संबंधित विषयाची तोंडी परीक्षा व श्रेणी परीक्षा नमूद दिनांकासच आयोजन करावे. सदर परीक्षेचे वेळापत्रक संबंधित शाळांनी विभागीय मंडळाकडे परीक्षेपूर्वी पाठवावे. त्यानुसार सदर परीक्षा कालावधीत विभागीय मंडळाचे भरारी पथक शाळेना भेटी देतील.

६) परीक्षेचा कालावधी कमी असल्यामुळे यावेळी तोंडी व श्रेणी परीक्षा Out of Turn ने आयोजित करण्यात येणार नाही. सदरची बाब सर्व माध्यमिक शाळांनी विदयार्थ्याच्या निदर्शनास आणून दयावी जेणेकरुन कोणताही विदयार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची नोंद घेवून विदयार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात.

७) प्रात्यक्षिक तोंडी परीक्षेचे साहित्य माध्यमिक शाळांना देण्याच्या तारखा शाळा प्रमुखांना नंतर कळविण्यात येतील. त्या तारखेस परीक्षेचे साहित्य घेवून जाण्याची व्यवस्था करावी. परीक्षेचे साहित्य न नेल्यास व त्यामुळे विदयार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस शाळा प्रमुख जबाबदार राहतील.

**<u>प्रात्यक्षिक परीक्षेसाठी महत्वाची सूचना</u>**

सप्टे./ऑक्टों.२०२१ विज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा संबंधित केंद्रसंचालकांनी केंद्रावर विज्ञान विषयाच्या पेपरच्या दिवशी आयोजित करावी व प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळेबाबत केंद्र संचालकांनी शाळा प्रमुखांना माहिती दयावी तसेच शाळा प्रमुखांनी सुध्दा केंद्र संचालकाशी संपर्क साधून प्रात्यक्षिक परीक्षेच्या निर्धारीत वेळेची माहिती घ्यावी व विदयार्थ्यांना प्रवेश पत्र **(Hall Ticket)** देतेवेळी विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणून त्याची स्वाक्षरी घ्यावी जेणेकरुन प्रात्यक्षिक परीक्षेपासून कोणताही विदयार्थी वंचित राहणार नाही.

केंद्र संचालकांनी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी केंद्र शाळांनी मार्च २०२१ परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या अंतर्गत व बहिस्त परीक्षकांची नियुक्ती करुन या परीक्षा केंद्र शाळेत आयोजित कराव्यात.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रत,**

केंद्रसंचालक - सप्टें /ऑक्टों. २०२१ परीक्षा यांनी विज्ञान विषयाच्या लेखी परीक्षेच्या दिवशी सायन्स प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन करण्यासाठी माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.